**प्रेसनोट २३/०३/२०१९**

**डेक्कन पोलीस स्टेशन पुणे शहर**

दिनांक २२/०३/२०१९ रोजी सकाळी १०/३० वा. चे सुमारास पुणे येथील शाळेत शिक्षण घेणाऱ्या दोन अल्पवयीन मुली वय-१५ ते १६ वर्षे या मुलींचे आई-वडिल त्यांची लग्ने करणार आहेत. मुलींचा आज १० वीचा शेवटचा पेपर संपल्यानंतर गुलबर्गा, कर्नाटक येथे घेवुन जाणार आहेत अशी माहीती मिळताच श्रीमती.निकम पोलीस उप-निरीक्षक,डेक्कन पोलीस स्टेशन पुणे व मपोशि ७१६४ माधुरी कुंभार, मपोशि ८०७६ स्वाती जगताप व पोलीस शिपाई ९९४९ अभिजीत चव्हाण डेक्कन पोलीस स्टेशन पुणे यांनी सदर शाळेत जावुन १० वी चा शेवटचा पेपर संपल्यानंतर त्या दोघी मुलींना भेटुन त्यांचेकडे चौकशी करता,त्यांनी आपले आई-वडिल मुळगावी घेवुन जावुन लग्न लावणार आहेत असे सांगितले. त्यामुळे त्यांना डेक्कन पोलीस स्टेशन येथील मा. दिपक लगड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक डेक्कन पोलीस स्टेशन पुणे यांचे मार्गदर्शनाखाली सदर मुलींचे जबाब नोंदवुन त्यांना बाल न्यायालय समिती समोर रिपोर्टा सोबत हजर केले. सदर मुलींना बाल न्यायालय समितीने संरक्षण कामी त्या संस्थे मध्ये दाखल करण्याचा आदेश दिल्याने, सदर मुलींना संस्थेत दाखल करण्यात आले आहे. पोलीसांचे मुळे त्यांना सज्ञान झाल्यानंतर त्यांच्या इच्छेप्रमाणे आयुष्य जगता येईल, शिक्षण घेता येईल असे म्हणुन यातील संबंधित मदत करणाऱ्या महिला नागरिक यांनी श्रीमती.निकम,पोलीस उप-निरीक्षक, डेक्कन पोलीस स्टेशन पुणे व स्टाफ यांचे तात्काळ कार्यवाही केल्याबद्दल आभार मानले आहेत.